# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ८ जानेवारी, २०१६ नुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील **"उप सचिव (विधी)"** या रिक्त पदावर कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

पात्र सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांनी सोबतच्या नमुन्यात संपूर्ण तपशीलासह आपले अर्ज उप सचिव (आस्थापना), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लेमेशन, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर **जाहिरातीच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाने (By Regd.AD) अथवा शीघ्र टपालाने (By Speed Post) सादर करावेत. फक्त नोंदणीकृत टपालाद्वारे अथवा शीघ्र टपालाद्वारे व मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्जांचाच विचार केला जाईल.**

१) **शैक्षणिक व इतर अर्हता :-**

**अ)** उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून विधी विषयात पदव्युत्तर पदवी (Master's Degree in Law) प्राप्त केलेली असावी.

**ब)** सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

२) **अनुभव :-**

**अ)** उमेदवारास उप सचिव वा त्यावरील दर्जाच्या पदावरील विधीविषयक कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**ब)** उमेदवारास विधीमंडळाच्या कामकाजासंदर्भात उद्भवणाऱ्या विधीविषयक व विधानमंडळाचे विशेषाधिकार त्याचप्रमाणे सदस्य निरर्हता यासंदर्भातील कामकाजाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३) **वयोमर्यादा :-** करार पद्धतीवर नेमणुकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ७० वर्षापेक्षा अधिक नसावे.

४) **नियुक्तीचा कालावधी :-** निवड झालेल्या उमेदवाराची प्रथम एक वर्षासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात येईल.

५) **निवड प्रक्रिया :-** पात्र अर्जांची संख्या विचारात घेऊन उमेदवाराची निवड अर्जांची छाननी करुन पात्रतेच्या व गुणवत्तेच्या (Eligibility & Merit) निकषांवर करण्यात येईल.

६) **इतर :-** उमेदवारांकडून प्राप्त होणारा एखादा अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

७) **पारिश्रमिक :-** सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यास विहित कार्यपद्धतीचे पालन करुन करार पद्धतीने नेमणूक करताना त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी असलेल्या एकूण वेतनात (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) आता मिळत असलेले एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. तथापि, सदर पारिश्रमिक रक्कम रु.४०,००० प्रतिमाहपेक्षा अधिक असणार नाही.

८) **नियुक्तीच्या कालावधीतील अटी व शर्ती :-**

१) करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ८ जानेवारी, २०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील व सदरहू व्यक्तीस याबाबत बंधपत्र / हमीपत्र देणे बंधनकारक राहिल.

२) नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहिल व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

**( ऋतुराज ज.कुडतरकर )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

**ठिकाण : मुंबई.**
**दिनांक : १६ जुलै, २०१६**